प्रेसनोट दि. २८/०७/२०१८

## पंढरपूर येथील नगरसेवक संदिप पवार हत्येप्रकरणातील आरोपीस २ पिस्तुलांसह दरोडा प्रतिबंधक पथकाकडुन अटक

दि २७/७/२०१८ रोजी आमचे पथकातील पोलीस नाईक शैलेश सुर्वे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की रेकॉर्डवरील गुन्हेगार शाहरूख शेख रा अप्पर इंदिरानगर पुणे हा मुंबई - बंगलौर हायवे रोडलगतचे सर्व्हिस रोडवरील गुडविल मोटर्स जवळ असलेल्या बियर शॉपी बाणेर पुणे या ठिकाणी येणार आहे.त्याचेकडे अवैध गावठी बनावटीचे पिस्टले असून तो सदर पिस्टल विक्री करणार आहे. सदर आरोपीस ताब्यात घेतले असता त्याचे कब्जात असलेल्या सॅकबॅगमध्ये २ गावठी पिस्टल ७००००/- रू व २ काडतुसे ४०० रू असा एकुण मिळूण ७०४००/- किंमतीचा माल मिळून आला.त्यानुसार त्याचेवर गुरनं ३१७/२०१८ अन्वये चतुंश्रुंगी पो.स्टे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी शाहरूख अकबर शेख याचे विरुध्द पंढरपूर शहर पोलीस ठाणे जिल्हा पंढरपूर येथे खुनाचा गुन्हा दाखल असुन,गुन्हा रजि नंबर २४४/२०१८ भादवी कलम ३०२,३०३,२०१,१४७,१४८ आर्म ॲक्ट ३(२५)(२७) प्रमाणे गुन्हा नोंद आहे. सदर गुन्ह्यात तो गेले चार महीण्यापासुन फरारी आहे.शाहरूख अकबर शेख हा पुणे शहरातील सराईत गुन्हेगार असून त्याचेवर दरोडा,चोरी मारहाणीचे,अपहरणाचे ८ गुन्हे दाखल आहेत

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त पंकज डहाणे, मा. सपोआ गुन्हे-१, समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक विद्युलता चव्हाण, लक्ष्मण ढेंगळे, पोलीस कर्मचारी संजय दळवी, अजय थोरात, राहुल घाडगे, सचिन अहिवळे, मल्लिकार्जुन स्वामी, संदिप ठाकरे , विल्सन डिसोजा व प्रविण जाधव यांनी केली आहे.